महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा
MHADA

==========================================================

जावक क्रमांक – ७५७/५५ दिनांक :- २३ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे बृहत सूचीवरील पात्र भाडेकरू/रहिवासी यांच्यासाठी २४ एप्रिल रोजी संगणकीय सोडतीचे आयोजन

मुंबई, दि. २३ एप्रिल, २०२५ :- म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे बृहतसूची समितीद्वारे उपकरप्राप्त इमारतींमधील पात्र भाडेकरू व रहिवासी यांच्यासाठी १७८ कायमस्वरूपी सदनिकांचे वितरण करण्यासाठी गुरुवार, दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता संगणकीय सोडतीचे आयोजन करण्यात आले आहे.

वांद्रे (पूर्व) येथील म्हाडा मुख्यालयातील भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृहात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते सदर सोडत काढण्यात येणार आहे.

म्हाडाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याचा सदर सोडत एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, उपकरप्राप्त इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या पात्र भाडेकरू आणि रहिवाशांना कायमस्वरूपी निवासस्थानाची हमी देण्याचे उद्दिष्ट या माध्यमातून साधले जात आहे.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) या कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

###

मुख्य जनसंपर्क अधिकारी/म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. : 757/55 Dt. April 23, 2025

**Press Release**

# MHADA to conduct computerised lottery on April 24 for 178 eligible applicants on the Master List

**Lottery to be organized by Mumbai Building Repairs and Reconstruction Board under the 100-Day Action Plan as per the directives of Mr. Sanjeev Jaiswal, IAS, VP and CEO, MHADA**

Mumbai, 23 April 2025: The Mumbai Building Repairs and Reconstruction Board (MBRRB) of MHADA has scheduled a computerised lottery for 178 eligible applicants listed on the Master List. The draw will be held on Thursday, 24 April 2025, at 1:00 PM, at the Bharatratna Gulzarilal Nanda Hall, MHADA Headquarters, Bandra (East).

The lottery is being conducted under the chairmanship of Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer, MHADA. This initiative constitutes an important component of MHADA's 100-Day Action Plan, which seeks to provide permanent housing to eligible occupants of cess buildings, thereby fulfilling the Authority's mandate to ensure housing security for citizens.

The 100-Day Action Plan has been formulated in accordance with the directives of Hon'ble Chief Minister Shri Devendra Fadnavis and Hon'ble Deputy Chief Minister and Housing Minister Shri Eknath Shinde, with a focus on enhancing administrative efficiency and delivering timely services to the public. Under the guidance of Mr. Jaiswal, this plan is being actively implemented to ensure effective and timely execution of public welfare measures.

###

Chief Public Relations Officer, MHADA